जा.क्र.प्राफसंके/रोवा/ ८१ /२०२०
प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले
दिनांक :- 04 MAY 2020

प्रति,

**विषय :-** रासायनिक खते खरेदीसाठी दरपत्रक पुरविणेबाबत..........

महाशय,

प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले रोपवाटिका विभागासाठी खालीलप्रमाणे रासायनिक खते खरेदी करावयाची असून याबाबत आपणांस विनंती करण्यात येते की, सदर रासायनिक खते पुरवठा करण्यास आपण इच्छुक असल्यास आपले दरपत्रक सिलबंद पाकिटातून खाली सही करणार यांच्या नावे दिनांक:- १८/५/२०२० पूर्वी/पर्यंत कृपया पाठवावे.

| अ.क्र. | खताचा तपशील | खरेदी करावयाचे अंदाजे प्रमाण |
|---|---|---|
| १. | युरिया | ०.५ टन |
| २. | सिंगल सुपर फॉस्फेट | २.० टन |
| ३. | म्युरेट ऑफ पोटॅश | ०.५ टन |
| ४. | सुफला (१५:१५:१५) | १.० टन |

१. दरपत्रकात वाहतूक भाडे, हमाली यासहित सर्व करांचा उल्लेख असावा.
२. वर उल्लेख केलेले सर्व साहित्य प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले येथे पोहच असावे.
३. दरपत्रकामध्ये GST क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे. तथापी GST क्रमांक लागू नसल्यास तत्सम प्राधीकरणाकडील नोंदणी क्रमांक असलेल्या निविदाकारांच्या लेटर हेड वरिल दरपत्रक सादर करावे. अशा दरपत्रकासोबत पुरवठादाराने पॅन कार्डची छायांकित प्रत सोबत जोडावी.
४. बंद पाकिटावर **'रासायनिक खते खरेदीचे दरपत्रक–रोपवाटिका'** असा उल्लेख करावा.
५. डाकघरद्वारे दरपत्रक मिळण्यास उशिर झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
६. कार्यालय कोणतेही कारण न देता आपल्या एकमेव स्वेच्छाधिकारावर हे दरपत्रक रद्द करण्याचा/मागे घेण्याचा/दुरूस्त करण्याचा किंवा नियत तारीख वाढविण्याचा अधिकार राखून ठेवीत आहे.

आपला विश्वासू,

सहयोगी संशोधन संचालक,
O/C प्रादेशिक फळ संशोधन केंद्र,
वेंगुर्ले. जि. सिंधुदुर्ग.